# लव-कुशांची कथा




म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ब्वा. वा
दा. क्र. १५८६३

१५८६३
ब्वा. वा

IRBK-0115873

TITLES NOW ON SALE

KRISHNA
SHAKUNTALA
THE PANDAVA PRINCES
SAVITRI
TEE STORY OF RAMA
NALA DAMAYANTI
HARISCHANDRA
THE SONS OF RAMA
HANUMAN
MAHABHARATA
CHANAKYA
BUDDHA
SHIVAJI
RANA PRATAP
PRITHVIRAJ CHAUHAN
KARNA
KACHA DEVAYANI
VIKRAMADITYA
SHIVA PARVATI
VASAVADATTA
SUDAMA
GURU GOBIND SINGH
HARSHA
BHEESHMA
ABHIMANYU
MIRABAI
ASHOKA
PRAHLAD
PANCHATANTRA
TANAJI
CHHATRASAL
PARASHURAMA
BANDA BAHADUR
PADMINI
JATAKA TALES
VALMIKI

Rs. 2.00 Each

OUR NEW TITLE:



# TARABAI

PUBLISHED IN ENGLISH, HINDI, MARATHI, GUJARATI, TELUGU, TAMIL, MALAYALAM, KANNADA AND BENGALI.

AVAILABLE AT ALL BOOKSTALLS OR

INDIA BOOK HOUSE

SECUNDERBAD 3


(For V.P.P. orders only)

# लव-कुशांची कथा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक [illegible] करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र [illegible] (८)

IRBK-0115873




आपले भाऊ लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्यासह राम लोकांना भेटायला जाई; त्यांच्या अडचणी समजून घेई.


आणि रोज संध्याकाळी सीतादेवी व राम आपल्या लोकांना भेटीला बोलवीत. एकदा...
बोल. तुला भिण्याचं कारण नाही.
महाराज, राणीसरकारच्या देखत मी कसा बोलू ?


महाराज, आज मी पाहिलं तर... एक धोबी आपल्या बायकोला मारीत होता...
चल, चालती हो या घरातून! दुसऱ्याच्या घरी राहणाऱ्या बायकोला घरात घ्यायला मी काही सीतेचा राम नाही!
बायकोला घरातून घालवायचं? केवळ धोबी तसं बोलला म्हणून? नाही--नाही! सीता आता आई होणार आहे!
पण लोकांचा मान राखणं हे माझं पहिलं कर्तव्य नाही का? सीतेला...


दुसऱ्या दिवशी त्याने लक्ष्मणाला बोलावले.
सीतेला रानात ने. तिला तिथे सोडून ये!
पण--
पण बीण नाही! ठरलं ते ठरलं!
लक्ष्मणाने रथ जोडला.
सीतेला त्याने अरण्यात नेले.


लक्ष्मणा, किती भयंकर रान हे! मला भीती वाटते!
हिला या घोर अरण्यात एकटी कशी सोडू? पण रामाची आज्ञा पाळली पाहिजे!
लक्ष्मण अयोध्येला गेला; इकडे सीता रानात एकटीच राहिली.
कुठे जाऊ मी?
इतक्यात एक साप वळवळत आला.
धावा! मेले!



घाबरू नकोस, बाळ ! हे प्राणी माझ्या आश्रमातले आहेत !
महर्षी वाल्मीकी-- आपण !
वाल्मीकींनी सीतेला आश्रमात नेले.
तू इथे राहा. तुला कसलाही त्रास होणार नाही.
वाल्मीकींच्या आश्रमात सीतेला घरच्यासारखे वाटले. लवकरच तिला दोन जुळे मुलगे झाले.


दिवसांमागून दिवस गेले. जुळे भाऊ लव-कुश मोठे झाले.
लवा, बाळा! कुश कुठे आहे रे?
अग आई, मी हरणाचे कान पिळतो आहे.
पण तुला महर्षींनी सांगितलंय ना, की मुक्या प्राण्यांशी दुष्टपणाने वागायचं नाही!
हरीणच माझ्याशी दुष्टपणाने वागलं
महर्षी वाल्मीकींनी त्यांच्या शिक्षणाकडे स्वतः लक्ष दिले.


चौदा वर्षे वनवासात घालवून राम अयोध्येला परतला आणि राज्य करू लागला· "
एक दिवस एक धोबी जे बोलला ते ऐकून रामाने जानकीला रानात हाकलले !
बिचारी जानकी! राम फार दुष्ट होता का हो?
वाल्मीकींनी त्यांना यज्ञ करायला शिकवले· दुसऱ्याही बऱ्याच गोष्टी शिकवल्या·
स्वाहा !
स्वाहा !
स्वाहा !
लव-कुश रोज लढाईची विद्या शिकत. जानकीबद्दलही त्यांचे बोलणे होई
जानकीचं काय झालं असेल रे?
ती दिसली तर आपण तिला आश्रमात आणू-
जानकी म्हणजेच आपली आई सीता हे त्यांना माहीत नव्हते !


आसपासचे कितीतरी राजे आपली सैन्ये घेऊन आले.
सैन्याचा यज्ञाशी काय संबंध ?
हे यज्ञ बघायला आलेले राजे वेळ पडल्यास रामाच्या बाजूनेही लढतील.


यज्ञशाळा सजवली गेली. यज्ञाची सर्व तयारी पूर्ण झाली.


पण नारदमुनींनी विश्वामित्रांजवळ शंका काढली.
सोबत बायको नसताना राम यज्ञ कसा करू शकतो?
हं! — सोन्याची सीता करावी म्हणतात.
काळ्या कानांचा पांढराशुभ्र घोडा यज्ञाचा अश्व म्हणून उभा होता.
किती देखणा घोडा आहे!
सर्व तयारी तर उत्कृष्ट आहे. फक्त सीता तेवढी नाही!
सीतेचे नाव ऐकून राम विचार करू लागला...
सीतेला आणण्यासाठी लक्ष्मणाला धाडतो.
पण नको! लोकांना कदाचित ते आवडणार नाही. सोन्याची प्रतिमाच बरी!


शस्त्रे कशी वापरावीत तेही त्यांना शिकविले.
दोरी जोरात ओढ आणि मग बाण सोडून दे!


लव-कुश जे जे नवे शिकत ते प्रत्यक्ष करून बघत.
हे रे काय? एकमेकांच्या जीवांवर उठलात की काय?
नाही ग आई! एकमेकांचे बाण हवेत अडवायला शिकतोय आम्ही!
बरं-बरं! चला आता जेवायला.



वाल्मीकींनी त्यांना रामायणाची कथा सांगितली. रामाने शिव-धनुष्य कसे मोडले आणि जानकीशी लग्न कसे केले ...
अं: ! त्यात काय ? मी पण मोडीन धनुष्य !
“ कैकेयीने रामाला चौदा वर्षे वनवासात धाडले. ”
वडिलांचं वचन पाळण्यासाठी मी रानात निघालोय्.
मी पण तुमच्याबरोबर येणार.
एक दिवस राम हरणाच्या शिकारीस गेला असता रावणाने सीतेला पळवले.
“मग रावणाशी रामाचे भयंकर युद्ध होऊन रावण ठार झाला.”
श्रीरामाचा विजय असो !


"चौदा वर्षे वनवासात घालवून राम अयोध्येला परतला आणि राज्य करू लागला."
एक दिवस एक धोबी जे बोलला ते ऐकून रामाने जानकीला रानात हाकलले !
बिचारी जानकी ! राम फार दुष्ट होता का हो ?
वाल्मीकींनी त्यांना यज्ञ करायला शिकवले. दुसऱ्याही बऱ्याच गोष्टी शिकवल्या.
स्वाहा !
स्वाहा !
स्वाहा !
लव-कुश रोज लढाईची विद्या शिकत. जानकीबद्दलही त्यांचे बोलणे होई.
जानकीचं काय झालं असेल रे?
ती दिसली तर आपण तिला आश्रमात आणू-
जानकी म्हणजेच आपली आई सीता हे त्यांना माहीत नव्हते !


इकडे अयोध्येत रामाने अश्वमेध यज्ञाची तयारी केली.


लोक त्याच्या राजवाड्यावरून जात असताना...
रामराजा आता जगज्जेता होईल !


यज्ञाला सर्वांना निमंत्रण होते.
महर्षी विश्वामित्र आणि महामुनी नारद पण आले आहेत !
हो, ते वसिष्ठ ऋषींच्या घरी राहताहेत.


स्वाहा ! -
स्वाहा !!


विश्वामित्र ऋषींनी घोड्याच्या कपाळावर सुवर्णाचे पान बांधले.
घोडा निघाला. युद्धाचे आव्हान देत मागून सेना चालली.


एक सैनिक धावत दौडत शत्रुघ्नाकडे गेला.
राजकुमार ! ती दोन कार्टी द्वाड आहेत. त्यांनी आमची जिरवली की हो !
मी शिकवतो त्यांना नीट वागायला!
रथ आहे म्हणून एवढी ऐट !
आपण उतरू या त्याचा नक्षा!
लवा, चाकावर मार!
हा बघ-- मा--रला !
एकाच बाणात रथाचा चुराडा !


शत्रुघ्न रथाखाली कोसळला, तेव्हा सैन्य सैरावैरा पळू लागले.
माझा एक जोडा हरवला!
माझी तलवार पडली!
काही सैनिक रामाकडे गेले.
श्रीरामाचा विजय असो! दोन पोरगे — दोनच, बरं का?...
होय, महाराज! त्यांनी राजकुमारांना रथाखाली पडायला लावलं!
शत्रुघ्नाचा पराभव?
रामाला हे विलक्षण वाटले!
दोन मुलं आणि इतकी शूर! कोण असतील ही? लक्ष्मणा, तू जाऊन त्यांना पकडून आण.
आत्ता जातो.


घोडा जेव्हा जेव्हा दुसऱ्या राजांच्या देशात जाई —
प्रधानजी, आपण काय करू या?
काही नाही. रावणाची ताकदसुद्धा रामापुढे अपुरी पडली. तिथे आपला काय पाड?
अनेक राजांनी युद्ध न करता रामाचे अजिंक्यपद मान्य केले.
अडवीत नाही!
कुणाची ताकद आहे आपल्याशी लढण्याची?
लव-कुशांनी लांबूनच घोडा पाहिला.
कुशा, आपण तो घोडा पकडू या का?
लवा, बघ बघ तरी! या घोड्याला जो अडवील त्याला म्हणे लढावं लागतं!
मग आपण लढू या!


लव-कुशांनी घोडा एका झाडाला बांधला.
रामाचा एक सैनिक त्यांच्याकडे आला.
मुलांनो, घोडा परत द्या बरं !
हात्तुझी! अशी भीक काय मागतोस!
आणि मग एक भयंकर लढाई झाली !


घोडा जेव्हा जेव्हा दुसऱ्या राजांच्या देशात जाई —
प्रधानजी, आपण काय करू या?
काही नाही. रावणाची ताकदसुद्धा रामापुढे अपुरी पडली. तिथे आपला काय पाड?
जनक राजांना युद्ध न करता रामाचे अजिंक्यपद मान्य केले.
कोणीच घोड्याला अडवीत नाही!
कुणाची ताकद आहे आपल्याशी लढण्याची?
लव-कुशांनी लांबूनच घोडा पाहिला.
कुशा, आपण तो घोडा पकडू या का?
लवा, बघ बघ तरी! या घोड्याला जो अडवील त्याला म्हणे लढावं लागतं!
मग आपण लढू या!


लव-कुशांनी घोडा एका झाडाला बांधला.
रामाचा एक सैनिक त्यांच्याकडे आला.
मुलांनो, घोडा परत द्या बरं !
हात्तुझी! अशी भीक काय मागतोस!
आणि मग एक भयंकर लढाई झाली !


एक सैनिक धावत दौडत शत्रुघ्नाकडे गेला.
राजकुमार! ती दोन कार्टी द्वाड आहेत. त्यांनी आमची जिरवली की हो!
मी शिकवतो त्यांना नीट वागायला!
रथ आहे म्हणून एवढी ऐट!
आपण उतरू या त्याचा नक्षा!
लवा, चाकावर मार!
हा बघ-- मा-- रला!
एकाच बाणात रथाचा चुराडा!


शत्रुघ्न रथाखाली कोसळला, तेव्हा सैन्य सैरावैरा पळू लागले.
माझा एक जोडा हरवला!
माझी तलवार पडली!
काही सैनिक रामाकडे गेले.
श्रीरामाचा विजय असो! दोन पोरगे — दोनच, बरं का?...
होय, महाराज! त्यांनी राजकुमारांना रथाखाली पडायला लावलं!
शत्रुघ्नाचा पराभव?
रामाला हे विलक्षण वाटले!
दोन मुलं आणि इतकी शूर! कोण असतील ही? लक्ष्मणा, तू जाऊन त्यांना पकडून आण.
आत्ता जातो.


लक्ष्मण सैन्यानिशी निघाला.
रामप्रभूचा विजय असो!
लक्ष्मण विचारात पडला.
दोन लहान मुलगे... रामा-विरुद्ध लढतात!
ए पोरांनो, जा पाहू आता!
आधी याची अवस्था बघा!


लवा, तू घोड्यापाशी राहा. मी याचा समाचार घेतो!
पोरा, तुला जगायचं आहे की नाही?
त्यापेक्षा तुम्हीच आता देवाचं नाव घ्या!
आणि कुशाने बाण मारला...
... त्या बाणाने लक्ष्मणाचे शिरस्त्राण उडाले!
सैनिकांची आपसांत कुजबुज सुरू झाली.
यांच्या बाणांत जादू आहे की काय?
त्यांच्याशी जमवूनच घेतलं पाहिजे


कुश आणि लक्ष्मण यांची घनघोर लढाई जुंपली.
लढाईत कुश जखमी झाला.
लवाने संतापून लक्ष्मणाला द्वंद्वाचे आव्हान दिले.
कुशाला तू जे केलंस त्यानंतर तुला मी जिवंत
नाही!


लवाने सूड उगवला. लक्ष्मणाला त्याने बेशुद्ध पाडले.
पळा...पळा
लक्ष्मण पडला!


रामाला हे कळले तेव्हा तो गडबडून गेला.
भरता, तू आता वानरसैन्य घेऊन जा!


आणि वानरांनी युद्धाची तयारी केली.


हनुमान पण भरताबरोबर गेला.
लव-कुश एकमेकांकडे पाहून हसले.
ए! याच्या माकडचेष्टा आपण बंद पाडू या का?
मी तरी तेच म्हणतो!
तत्क्षणी एक बाण येऊन हनुमानाच्या गदेत घुसला.
या कार्ट्यांना स्वर्गाची वाट दाखवतो!
वानरसेना लव-कुशांविरुद्ध लढू लागली.
पण त्यांची काही मात्रा चालेना!




IRBK-0115873


ही मुले आहेत कोण याची चौकशी करण्याचे रामाने ठरवले.
तुमचे आई बाबा कोण ?
बाबांची काही माहिती नाही. आमची आई सीता. पण तुम्हांला का हो चौकशा ?


मुलांनी जरी वडिलांना ओळखले नाही, तरी रामाला तेव्हाच त्यांची ओळख पटली. धनुष्य त्याच्या हातातून गळून पडले.
तुम्ही सीतेची...
बघ... तो बेशुद्ध पडतो आहे! आपण नुसतं बोललो तर एवढं... चल, आपण त्याच्या सैन्याचा समाचार घेऊ!


लवकरच लव-कुशांनी वानरांना शरण आणले.
हनुमानाला त्यांनी घोड्याजवळ बांधून ठेवले.
आपण वांदर पकडलेला पाहून आई खूष होईल !
वानरांचा समाचार घेतल्यावर लव-कुश रामाकडे परत आले.
बाप रे ! अजून बेशुद्ध !
त्याचा मुगुट काढून घेऊ या का ?


घोडा आणि मुगुट घेऊन लव-कुशांच्या स्वाऱ्या आईकडे गेल्या.
आई, आम्ही बघ केवढी लूट आणली !
देवा - देवा ! तुम्ही त्यांना मारलंत ?
राम शुद्धीवर आला तेव्हा वाल्मीकींनी लव-कुशांना त्याच्याकडे आणले.
रामा, ही घे तुझी बाळं !
महर्षी !
अग, ते मेले नाहीत, आई ! जिवंत आहेत !
म्हणजे, लवा... रामायणातली जानकी म्हणजे आपली आईच की रे !


अजूनही बांधलेलाच होता.
पोरांनो, तुम्ही मला कधी सोडणार आहात?
मग म्हणा बघू, रामाचा विजय असो!
वाल्मीकीने सीतेला पुढे आणले.
रामा, तू सीतेला परत नेलं पाहिजेस.
महर्षी! एकदा तिचा त्याग केल्यावर मी तिला परत कशी नेऊ?
सीतेला हा अपमान आता सहन होईना.
धरणीमाते! मी शुद्ध असेन तर तूच मला पोटात घे!


आणि पायांखालची जमीन दुभंगली...
आई, दूर हो! पृथ्वीला भेगा पडताहेत!
माते, माझी प्रार्थना ऐकलीस!
...आणि सीता पृथ्वीतळी जाऊ ले
आई! – आई!
रामाने आपल्या रडणाऱ्या मुलांना पोटाशी धरले.
बाळांनो, दुःख करू नका. तुमची आई तिच्या आईकडे गेली!
सीतेबद्दल ऐकलं ते खरं असावं! ती भूमिकन्या होती.